## शिक्षण विभाग (प्राथमिक), जिल्हा परिषद अमरावती

## जाहिरात

**अमरावती जिल्हयातील पेसा क्षेत्रातील तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी शिक्षक पद भरती प्रक्रियेकरिता अमरावती जिल्ह्यातील अनुसूचित जमाती व अन्य इतर प्रवर्गातील शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता धारण करणाऱ्या उमेदवारांचे अर्ज मागविणेबाबत.**

**संदर्भ:-** शालेय शिक्षण व क्रीडा विभागाकडील शासन पत्र क्रमांकः संकीर्ण २०२४/प्र. क्र. ४१४/टीएनटि-१, दि.१५/०७/२०२४

संदर्भीय शासन पत्रानुसार पेसा क्षेत्रातील शाळांमध्ये नियमित शिक्षकांची भरती होईपर्यंत विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये या करिता.

१. रिक्त पदांच्या तुलनेत पेसा क्षेत्रातील अनुसुचित जमातीचे उमेदवार उपलब्ध न झाल्यास शासन तरतुदीनुसार पदे रिक्त राहील्यास अनुसूचित जमाती प्रवर्ग व अन्य इतर प्रवर्गातील **शिक्षक पदासाठी पात्रता धारण करणारे (D.ed/B.ed+TAIT+TET/CTET उत्तीर्ण )उमेदवार** यांची तात्पुरत्या कालावधी करीता मानधन तत्वावर कंत्राटी पध्दतीने नियुक्ती देणेसाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.

उपरोक्त जाहिरातीमध्ये नमूद केल्याप्रमाणे **अमरावती जिल्ह्यातील** इच्छुक उमेदवारांचे अर्ज दि. ३०/०९/२०२५ (शासकीय सुट्ट्या वगळून ) रोजी पर्यंत **शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जि. प. अमरावती या कार्यालयाच्या टपालामध्ये (आवक-जावक) कार्यालयीन वेळेत सादर करण्यात यावेत. विस्तृत जाहिरात, अर्जाचे नमुने व इतर प्रारूप www.zpamravati.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.** विहित मुदतीनंतर या कार्यालयास प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. तसेच या कार्यालयास प्राप्त झालेल्या अर्जामधून पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी जिल्हा परिषदेच्या अधिकृत वेबसाईट प्रसिद्ध करण्यात येईल.इतर जिल्ह्यातील उमेदवारांचे अर्ज ग्राह्य धरण्यात येणार नाही.

**उमेदवार निवडण्याचा प्राधान्य क्रम खालील प्रमाणे राहील.**

१) पेसा क्षेत्रातील अनुसूचित जमाती प्रवर्गाचे पात्र उमेदवार
२) पेस क्षेत्रातील इतर प्रवर्गातील पात्र उमेदवार
३) सर्व साधारण क्षेत्रातील अनुसुचित जमातीचे पात्र उमेदवार
४) सर्व साधारण क्षेत्रातील इतर प्रवर्गाचे पात्र उमेदवार

**(टीप :- सदरची कंत्राटी भरती ही प्राथमिक शिक्षक वर्ग १ ते ८ शिक्षक पदा करीता अर्हता धारण करणाऱ्या (D.ed/B.ed+TAIT+TET/CTET उत्तीर्ण ) उमेदवारांच्या अर्जाचा विचार केला जाईल याची नोंद घ्यावी तसेच उमेदवाराची निवड करणे अथवा निवड रद्द करणे याबाबतचा अधिकार प्रशासन स्तरावर राखुन ठेवण्यात येत आहे.)**

Sanjita

(संजिता महापात्र भा. प्र. से.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद अमरावती**

**प्रतिलीपी:-**1.मा. आयुक्त शिक्षण, शिक्षण आयुक्तालय महाराष्ट्र राज्य पुणे यांना माहितीस्तव सविनय सादर.
2.मा. शिक्षणसंचालक (प्राथमिक)शिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे यांना माहितीस्तव सादर.
3.कक्ष अधिकारी शालेय शिक्षण व क्रिडा विभाग मंत्रालय मुंबई यांना माहिती करीता

Sanjita

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद अमरावती**

# प्रेसनोट

**संदर्भ:-** शालेय शिक्षण व क्रिडा विभाग यांचे पत्र क्रमांक संकीर्ण 2024/प्र.क्र.414/टिएनटि-1दि.15/07/2024

शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, महाराष्ट्र शासन यांचे कडील सुचने नुसार पेसा क्षेत्रातील शाळांमध्ये नियमित शिक्षकांची भरती होई पर्यत. पेसा क्षेत्रातील अनुसुचित जमाती व अन्य प्रवर्गातील उमेदवारा मधुन कंत्राटी तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात जिल्हा परिषद अमरावती येथील पेसा क्षेत्रातील शिक्षकीय रिक्त पदे भरण्यात येणार आहे.

**सदर नियुक्तीसाठी पुढील प्रमाणे अटी व शर्ती लागु आहेत**

1. **सदर नियुक्ती ही पुर्णत:कंत्राटी स्वरुपाची आहे**
2. **मानधन रु.20000/-(अक्षरी वीस हजार रुपये)प्रतीमाह (कोणत्याही इतर लाभा व्यतिरीक्त)**
3. **नियुक्ती धारकास शिक्षणाधिकारी (प्राथ.)याच्याशी करारनामा स्वाक्षरीस करणे आवश्यक राहील**
4. **नियुक्तीच्या कालावधीत करार पध्दतीने शिक्षकीय पदाचे काम करण्याची जबाबदारी संबंधीत व्यक्तीची राहील**
5. **बंधपत्र/हमीपत्र नियुक्ती धारकास शासनाने विहित केलेल्या अटी व शर्ती, विभागाने निश्चित केलेल्या अतिरिक्त अटी व शर्ती मान्यअसल्या बाबतचे बंधपत्र/हमीपत्र देणे अनिवार्य आहे.**
6. **सदरचे अर्ज शिक्षण विभाग (प्राथ.) जिल्हापरिषद, अमरावती येथे कार्यालयीन वेळेत सादर करणे अनिवार्य आहे**
7. **सदर मानधन तत्वावरील नियुक्तीसाठी अर्ज सादर करणेसाठी दि. 30/09/2025 ही दिनांक अंतिम असेल तदनंतर प्राप्त अर्जाचा विचार केला जाणार नाही**
8. **वरील प्रमाणे करण्यात आलेली नियुक्ती नियमित शिक्षक उपलब्ध होई पर्यतच /शैक्षणीक सत्र सन 2025-2026 अथवा किंवा करार नाम्यातील मुदत यापैकी जी बाब आधी होईल त्या कालावधी पर्यत राहील.**
9. **सदर नियुक्ती हि पेसा क्षेत्रा करीता असल्याने फ़क्त पेसा क्षेत्रात काम करण्यास ईच्छुक उमेदवांराचे अर्ज स्विकारण्यात येतील.** ( चिखलदरा / धारणी )
10. **शासन स्तरावरुन उपलब्ध तरुतुदी नुसार मानधन अदा करण्यात येत जाइल.**
11. **कोणतेही कारण न देता अर्ज नाकारण्याचा अधिकार नियुक्ती प्राधिकारी यांचे कडे राखुन ठेवण्यात येत आहे.**
12. **नियुक्ती कालावधीत शासन नियमांचे पालन करणे बंधनकारक राहील. गैरवर्तन, कामात हयगय, हलगर्जीपणा, निष्क्रियता आढळुन आल्यास तात्काळ नियुक्ती रद्द करण्यात येईल.**

**ईच्छुक उमेदवारांनी शिक्षण विभाग (प्राथ.) जि. प. अमरावती येथे कार्यालयीन वेळेत अर्ज सादर करावेत(शासकीय सुट्टीच्या दिवशी अर्ज स्विकारले जाणार नाही) अर्जाचा नमुना-अ, अटी व शर्ती, ईत्यादी बाबी जिल्हापरिषद अमरावतीच्या** www.zpamravati.gov.in **या साईटवर पाहण्यास उपलब्ध आहेत.**

(सतीश मुगल)
**शिक्षणाधिकारी (प्राथ.)**
**जिल्हा परिषदअमरावती**

**प्रतिलीपी:**-1.मा. शिक्षण संचालक (प्राथमिक)शिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे यांना माहितीस्तव सादर.
2.कक्ष अधिकारी शालेय शिक्षण व क्रिडा विभाग मंत्रालय मुंबई यांना माहिती करीता.

**शिक्षणाधिकारी (प्राथ.)**
**जिल्हा परिषदअमरावती**

शिक्षण विभाग (प्राथमिक),जिल्हा परिषद अमरावती

*************************************************************************************************************

## पेसा क्षेत्रकंत्राटीशिक्षकपदभरती- २०२५

### पेसा क्षेत्रातील कंत्राटीशिक्षकपदभरती प्रक्रियेकरिता अनुसूचित जमाती व अन्य इतर प्रवर्गातील शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता धारण करणाऱ्या उमेदवारांकरिता अटी व शर्ती

उमेदवारांची शैक्षणिक व व्यावसायीक अर्हता:-

१) इ. १ ली ते ५ वी, ६ वी ते ८ वी, ९ वी ते १० वी व ११ वी ते १२ वी यासाठी शैक्षणीक व व्यावसायीक अर्हता शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या शासन निर्णय क्र. संकीर्ण २०१८/प्र.क्र.३९७/टीएनटी-१ दिनांक ७/२/२०१९, शुध्दीपत्रक दिनांक २५/२/२०१९ दि.१६ मे २०१९ व दि. १२/६/२०१९ दि. १०/११/२०२२ मध्ये नमुद केल्यानुसार राहील.

२) शिक्षक पात्रता परीक्षेबाबत शालेय शिक्षण विभागाचा शासन निर्णय १३/०२/२०१३,२३/०८/२०१३ दि.०१ जानेवारी २०१९ शासन पत्र दिनांक २४/१०/२०१९ व ३०/६/२०२२नुसार अर्हता आवश्यक आहे.

i) **इ. १ ली ते ५ वी साठी शैक्षणिक व व्यावसायीक अर्हता-उच्च् माध्यमीक उत्तीर्ण** (खुल्या प्रवर्गासाठी-४५ टक्के **गुणांसह व मागासवर्गीय प्रवर्गासठी -४० टक्केगुणांसह) व व्यावसायीक अर्हता** –D.Ed/ D.El.ED/ D.T.Ed/D.Ed (Spl.Education)/T.C.H./TET-Paper -१ **किंवा** CTET- Paper -१उत्तीर्ण आवश्यक आहे.

ii) **इयत्ता ६ वीते ८ वी साठी शैक्षणीक व व्यावसायीक अर्हता-संबंधीत विषयातील पदवी** (पदवीच्या अंतिम वर्षी **खुल्या प्रवर्गासाठी-४५ टक्के गुणांसह व मागासर्गीय प्रवर्गासाठी-४० टक्के गुणांसह) व व्यावसायीक अर्हता**D.Ed/ D.El.ED/ D.T.Ed/D.Ed (Spl.Education)/T.C.H./B.Ed./B.A. Ed./B.Sc.Ed. **तसेच शिक्षक पात्रता परिक्षा- पदवीच्या संबंधीत विषयामध्ये** TET-Paper-२ **किंवा** CTET-Paper-२ **खालील विषय गटासाठी त्यांच्या नावा समोर दर्शविलेली शिक्षक पात्रता परीक्षा उत्तीर्ण आवशक आहे.**

अ) गणित-विज्ञान, गणित, विज्ञानयाविषयासाठी-विज्ञान/गणित

ब) इतिहास, भुगोल, सामाजिकशास्त्र इत्यादी विषयासाठी-सामाजिकशास्त्र

क) भाषाविषयासाठी –विज्ञान/गणित किंवा सामाजिक शास्त्र यापैकी कोणतीही.

३) **मासिक मानधन-** मानधन रुपये २०,०००/-प्रतीमाह (कोणतेही इतर लाभा व्यतिरिक्त )

४) जिल्हा परिषदेच्या वतीने शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्याशी अर्जदारास **करारनामा स्वाक्षरीत करणे** आवश्यक राहील.

५)**बंधपत्र / हमीपत्र**: नियुक्तीच्या कालावधीत करार पद्धतीने शिक्षकीय पदाचे विहित काम पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित व्यक्तीची राहील, **या आशयाचे बंधपत्र / हमीपत्र देणे आवश्यक आहे.** या बंधपत्र / हमीपत्रामध्ये करार पद्धतीने नियुक्ती देतांना शासनाने विहित केलेल्या अटी व शर्ती, विभागाने निश्चित केलेल्या अतिरिक्त अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचा तसेच कंत्राटी पद्धतीने नेमणूक करण्यात आलेल्या उमेदवारांकडून सदर पदांवर कायम करणेबाबत भविष्यात कोणत्याही प्रकारचा हक्क अथवा न्यायालयीन दावा करणार नसलेबाबत उल्लेख करणारे हमीपत्र / बांधपत्र लिहून देणे बंधनकारक असेल. (**सदरचे बंधपत्र / हमीपत्र रुपये १००/- स्टॅम्पपेपर देण्यात यावे.**)

६) अर्जदार/उमेदवारांवर **कोणत्याही प्रकारचा गुन्हा व आरोप नसल्याचे प्रतिज्ञापत्र** स्वतंत्रपणे सादर करावे.

७) जाहिरातीमध्ये नमूद करण्यात आलेली **नियुक्ती नियमित शिक्षक उपलब्ध होईपर्यंतच असेल.**

८)अर्जदार/उमेदवारांनी **विहित नमुन्यात अलीकडच्या काळातील साक्षांकित पासपोर्ट साईज फोटोसह आवश्यक कागदपत्रसह परिपूर्ण अर्ज (परिशिष्ट- अ) सादर करावा.** अर्जाच्या पाकीटावर **कंत्राटी शिक्षक पदाकरिता अर्ज** असे स्पष्ट नमूद करावे.

९) पात्र व इच्छुक उमेदवारांनी आवेदन पत्र शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद अमरावती **या कार्यालयात दि. ३०/०९/२०२५ रोजीपर्यंत सादर करावे.यानंतर आलेले आवेदन पत्र स्वीकारले जाणार नाहीत.**

**१०)शासनाद्वारे नियमित शिक्षक उपलब्ध झाल्यास कंत्राटी पद्धतीने शिक्षक पदी नियुक्ती देण्यात आलेल्या उमेदवारांना कोणतीही पूर्व सूचना न देता त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.**

शिक्षणाधिकारी (प्राथ.)
जिल्हा परिषद, अमरावती.

(संजिता महापात्र भा. प्र. से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अमरावती

## परिशिष्ट-अ

### पेसा क्षेत्रातील भरती प्रक्रियेकरिता अमरावती जिल्ह्यातील अनुसूचित जमाती व इतर प्रवर्गातील शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता धारण करणाऱ्या उमेदवारांकरिता विनंती अर्ज

**(शैक्षणिक वर्ष सन २०२५-२६)**
**कंत्राटी शिक्षक पदाकरीता अर्ज**

प्रति,
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हापरिषद, अमरावती

उमेदवाराचा अलिकडच्या काळातील पासपोर्ट साईजफोटो

**विषय: पेसा क्षेत्रातील भरती प्रक्रियेकरिता अमरावती जिल्ह्यातील अनुसूचित जमाती व इतर प्रवर्गातील शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता धारण करणाऱ्या उमेदवारांकरिता जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये कंत्राटी तत्वावर तात्पुरत्या स्वरूपात नियुक्ती मिळणेबाबत.**

१. उमेदवाराचे नाव :- श्री./श्रीमती.

..............................................................................................................................

(आडनाव) (स्वत:चेनांव) (वडीलांचे /पतीचेनाव)

२. पत्रव्यवहाराचापत्ता (पिनकोडसह) :-

..............................................................................................................

..............................................................................................................

..............................................................................................................

३. जन्मतारीख (शालान्त प्रमाणपत्रा नुसार) :- ..............................................................................

४. प्रवर्ग :- ..........................................जात :-......................................

५. ईमेलआयडी:- ..............................................................................................

६. मोबाईल नंबर :- १....................................२................................................

७. वय (दिनांक

८. ३०/०६/२०२५रोजी) .................. वर्ष ..................महिना..................दिवस

उमेदवाराने अर्जासोबत खालीलप्रमाणे कागदपत्रांच्या स्व-प्रमाणित केलेल्या छायांकित प्रती जोडणे आवश्यक आहे.

| अ. क्र. | आवश्यक कागदपत्रसूची | होय / नाही | पृष्ठक्रमांक |
|---|---|---|---|
| १ | TAIT परीक्षा क्रमांक- | | |
| २ | TAIT परीक्षा गुण | | |
| ३ | जातप्रवर्ग- | | |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | एस.एस. सी. गुणपत्रक | | |
| ५ | एस.एस. सी. प्रमाणपत्र | | |
| ६ | एच.एस. सी. गुणपत्रक | | |
| ७ | एच.एस. सी. प्रमाणपत्र | | |
| ८ | पदवीपरीक्षा गुणपत्रक (संबंधित विषयात किमान ५०% गुणांसह उत्तीर्ण )उत्तीर्ण वर्ष वगुण नमूद करावे | | |
| ९ | पदवीचाविषय (विषय नमूद करावा) | | |
| १० | पदवीपरीक्षा प्रमाणपत्र | | |
| ११ | पदव्युत्तरपरीक्षा गुणपत्रक | | |
| १२ | पदव्युत्तरपरीक्षा प्रमाणपत्र | | |
| १३ | शिक्षणशास्त्रपदविका गुणपत्रक D.ED. /D.T.ED. | | |
| १४ | शिक्षणशास्त्रपदविका प्रमाणपत्र D.ED. /D.T.ED. | | |
| १५ | शिक्षणशास्त्रपदवी गुणपत्रक B.ED./B.Sc.Ed. | | |
| १६ | शिक्षणशास्त्रपदवी प्रमाणपत्र B.ED./B.Sc.Ed. | | |
| १७ | एम.एस. सी. आय. टी. प्रमाणपत्र | | |
| १८ | शिक्षकपात्रता परीक्षा पेपर-१ (T.E.T.) प्रमाणपत्र (१ ली ते ५ वी ) उत्तीर्ण वर्ष व गुणनमूद करावे. | | |
| १९ | केंद्रीयपरीक्षा पात्रता परीक्षा पेपर-१(C.T.E.T.) प्रमाणपत्र (१ ली ते ५ वी ) उत्तीर्णवर्ष व गुण नमूद करावे. | | |
| २० | शिक्षकपात्रता परीक्षा पेपर-2 (T.E.T.) प्रमाणपत्र उत्तीर्ण वर्ष व गुण नमूद करावे. | | |
| २१ | केंद्रीयपरीक्षा पात्रता परीक्षा पेपर-2 (C.T.E.T.) प्रमाणपत्र उत्तीर्ण वर्ष व गुण नमूद करावे. | | |
| २२ | जातीचेप्रमाणपत्र | | |
| २३ | जातवैधता प्रमाणपत्र | | |
| २४ | नॉनक्रिमिलेयर प्रमाणपत्र (अ. जा. , अ. ज. वगळून) | | |
| २५ | लहानकुटुंब प्रतिज्ञापत्र | | |
| २६ | शाळासोडल्याचा दाखला | | |

| | | | |
|---|---|---|---|
| २७ | जन्मप्रमाणपत्र (शालांत प्रमाणपत्र / शाळा सोडल्याचा दाखला) दि.३०/०६/२०२५ रोजीचेवय | | |
| २८ | महाराष्ट्रातीलरहिवासी असल्याचा अधिवास दाखला | | |
| २९ | आधारकार्ड | | |
| ३० | दिव्यांगत्वाचादाखला (संगणकीय प्रणालीमार्फत वितरित प्रमाणपत्र) (किमान ४०% दिव्यांग) | | |
| ३१ | शिक्षकपात्रता परीक्षा (TET) गैरप्रकारमधील असल्यास चारित्र्य पडताळणी दाखला | | |
| ३२ | नावातबदल असल्यास राजपत्र | | |

दिनांक :-

स्थळ :- (उमेदवाराचे नाव स्वाक्षरी)

**पेसा क्षेत्र कंत्राटी शिक्षक पदभरती २०२५**

**सेवा करारनामा**

आज दिनांक. / /२०२५ रोजी खालील प्रमाणे करार करण्यात येत आहे

**मा. शिक्षणाधिकारी (प्राथमिक),**
**जिल्हा परिषद अमरावती**

**या करारासाठी पक्ष क्रमांक १**

करार पेसा क्षेत्रातील भरती प्रक्रियेकरिता अनुसूचित जमाती व इतर प्रवर्गातील शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता धारण करणाऱ्या उमेदवाराचे नाव श्रीश्रीम / .ती.............................................................................. .वय....................वर्ष

पत्ता.....................................................................................................................................

**या करारासाठी पक्ष क्रमांक २**

सदर सेवा कराराचे नियमन करणाऱ्या **अटी/शर्ती** खालीलप्रमाणे असतील.

१. करार कंत्राटी उमेदवाराचे नाव ..........................................................................................पक्ष क्र.२ यांची नियुक्ती नियमित शिक्षक उपलब्ध होईपर्यंत असेल. त्यानुसार त्यांचा कामाचा कालावधी असेल अथवा शासन / मा. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडून निर्गमित होणाऱ्या सूचनांच्या अधीन राहून करण्यात येत आहे.

२. सहायक शिक्षक / पदवीधर शिक्षक म्हणून असणारी विहित कामे करणे हे पक्ष क्र.२ ला बंधनकारक राहतील.

३. सदर कामासाठी पक्ष क्र.१ हे पक्ष क्र.२ यांना प्रतिमास रु.२०,०००/- (वीस हजार मात्र) इतके मानधन शासन स्तरावरुन अनुदान उपलब्ध् झाल्यावर अदा करेल व सदर सेवा कराराचे कालावधीत मानधनात बदल होणार नाही.

४. सदर सेवा करार पक्ष क्र.२ एक महिन्याच्या पूर्व सूचनेने समाप्त करता येईल. एक महिन्याची पूर्व सूचना न दिल्यास एक महिन्याचा पगार जमा करावा लागेल हि अट पक्ष क्र. २ ला मान्य आहे.

५. पक्ष क्र. २ हे पक्ष क्र. १ यांचे कार्यालयात प्राधिकृत केलेले अधिकारी यांचे नियंत्रणाखाली स्वतःच्या जबाबदारीवर काम करेल व कराराचे कालावधीत कोणत्याही तऱ्हेच्या अनपेक्षित कारणामुळे अथवा झालेल्या अपघातामुळे त्यास कोणत्याही प्रकारची शारीरिक व मानसीक इजा झाल्यास त्यासाठी पक्ष क्र. १ कोणत्याही प्रकारे जबाबदार असणार नाही.

६. पक्ष क्र. २ कार्यालयामध्ये काम करण्यासाठी वक्तशीरपणे नियमित उपस्थित राहील व दैनिक टाचण काढुन अध्यापन कार्य करेल. तसेच पक्ष क्र. २ ची कार्यालयातील वर्तणूक व कामाची गुणवत्ता उच्च दर्जाची राहील व त्याचे उत्तरदायित्व पक्ष क्र. १ च्या सर्व हितसंबंधाची रक्षा करणेचे राहील.

७. पक्ष क्र. १ यांनी वेळोवेळी निर्गमित केलेले नियम व सूचना पक्ष क्र. २ यास बंधनकारक राहतील व त्याच प्रमाणे विहित केलेल्या गुणवत्तेनुसार पक्ष क्र. २ कडून काम न झाल्यास पक्ष क्र. १ चे निर्देशनास आल्यास सदर सेवा करार तात्काळ रद्द करण्याचे अधिकार पक्ष क्र. १ कडे राहतील .

८. पक्ष क्र. २ या सेवा कराराचे कालावधीत अन्ये ठिकाणी कोणतेही काम स्वीकारण्यास मनाई राहील.

९. पक्ष क्र. २ यांच्यावर कोणत्याही प्रकारचा गुन्हा व आरोपपत्र नसल्याचे प्रमाणपत्र स्वतंत्र सादर करावे लागेल.

१०. या सेवा करारपत्रचे कोणत्याही कलमाबाबत वा अन्य कोणत्याही नियमाबाबत विवाद निर्माण झाल्यास पक्ष क्र. १ चा निर्णय अंतिम राहील व त्याबाबत कोणत्याही प्रकारची तक्रार / सूचनेची दखल घेतली जाणार नाही.

११. पक्ष क्र. २ यांची नियुक्ती हि तात्पुरत्या स्वरुपाची असल्यास भविष्यात पूनरनियुक्ती अथवा पदस्थापना कामी किंवा वरिष्ठ प्राधिकरणाकडे तसेच न्यायालयाकडे दाद मागण्याचा अधिकार पक्ष क्र. २ यास राहणार नाही.

१२. पक्ष क्र. २ यांना जिल्हा परिषद यंत्रणेकडून वेळोवेळी देण्यात येणाऱ्या सूचना व आदेश बंधनकारक राहतील.

१३. उमेदवार हे वैद्यकीय दृष्ट्या सेवा करण्यास सक्षम असल्याचे जिल्हा शल्य चिकीत्सक यांचे प्रमाणपत्र सादर करणे पक्ष क्र. २ यांना बंधनकारक राहील. सदरचे प्रमाणपत्र नियुक्ती पासुन ७ दिवसाच्या आत सादर न केल्यास पक्ष क्र. २ यांची नियुक्ती रद्द होईल.

१४. वरील प्रमाणे करण्यात आलेली नियुक्ती नियमीत शिक्षक उपलब्ध होईपर्यंत अथवा करारनाम्यातील मुदत (एप्रिल 2026) यापैकी जी बाब प्रथम येईल त्या कालावधी पर्यंत लागू राहील.

१५. पक्ष क्र. २ यांनी १ ते १४ पैकी कोणत्याही अटी / शर्तीचा भंग केल्यास कोणताही पूर्वसूचना न देता आदेश रद्द करण्याचे अधिकार पक्ष क्र. १ यांना राहतील.

दिनांक:- स्वाक्षरी

**(नाव--------------------------------------------)**

**पक्ष क्र. २**

दिनांक : स्वाक्षरी

**(नाव--------------------------------------------)**

**पक्ष क्र. १**

साक्षीदार

१) ..............................................................

२) ..............................................................

## बंधपत्र / हमीपत्र

मी श्री./ श्रीमती ............................................................, पेसा क्षेत्रातील भरती प्रक्रियेकरिता अनुसूचित जमाती व इतर प्रवर्गातील शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता धारण करणाऱ्या उमेदवारअसे बंधपत्र / हमीपत्र लिहून देतो / देते की, नियुक्तीच्या कालावधीत कंत्राटी पद्धतीने शिक्षकीय पदाचे विहित काम पूर्ण करण्याची जबाबदारी माझी राहील, तसेचकंत्राटी पद्धतीने नियुक्ती देतांना शासनाने विहित केलेल्या अटी व शर्ती, विभागाने निश्चित केलेल्या अतिरिक्त अटी व शर्ती मला मान्य असतील, तसेच मी नियमित सेवेत घेण्याबाबत अथवा इतर कोणत्याही हक्काची मागणी करणार नाही.

**(उमेदवाराचे नाव स्वाक्षरी)**

## करारनामा

मी श्री / श्रीम. ............................................................, सेवा निवृत्त शिक्षक असे बंधपत्र / हमीपत्र लिहून देतो / देते की, नियुक्तीच्या कालावधीत करार पद्धतीने शिक्षकीय पदाचे विहित काम पूर्ण करण्याची जबाबदारी माझी राहील, तसेच करार पद्धतीने नियुक्ती देतांना शासनाने विहित केलेल्या अटी व शर्ती, विभागाने निश्चित केलेल्या अतिरिक्त अटी व शर्ती मला मान्य असतील, तसेच मी नियमित सेवेत घेण्याबाबत अथवा इतर कोणत्याही हक्काची मागणी करणार नाही.

**(नाव स्वाक्षरी)**